# बांधकाम कडील इतर योजना

## खासदांराचा स्थानिक विकास कार्यक्रम / आमदारांचा स्थानिक विकास / आमदारांचा(वि.प.स.) विकास / डोंगरी विकास कार्यक्रम

- सदर योजनेतून मंजुर करणेची कामे मा. खासदारसो , मा. आमदारसो, हे मा जिल्हाधिकारी जिल्हा नियोजन समिती यांना सुचित करतात.त्याप्रमाणे मा जिल्हाधिकारी जिल्हा नियोजन समिती हाती घ्यावयच्या कामाची यादी बांधकाम विभाग जिल्हा परिषद किंवा सार्वजनिक बांधकाम विभाग यांना कळवितात. सदरील कळविलेल्या कामांचा सविस्तर सर्व्हे करुन अंदाजपत्रके तयार करणेत येतात. मा जिल्हाधिकारी जिल्हा नियोजन समिती यांचेकडे तांत्रीक छाननी करून प्रशासकीय मंजुरीसाठी सादर केली जातात. तदनंतर मा जिल्हाधिकारी जिल्हा नियोजन समिती सदर कांमाना प्रशासकीय मंजुरी देवून कार्यान्वयीत योजनेकडे पूढील कार्यवाहीसाठी पाठवून देतात. या अंदाजपत्रकांना विभागीय पातळीवर तांत्रीक मान्यता दिली जाते. त्याप्रमाणे कार्यान्वय यंत्रणा निविदा निश्चिती करते.

**सदर योजनेतून खालीलप्रमाणे कामे घेता येतात.**

- १) सामाजिक सभागृह, सांस्कृतीक भवन, समाज मंदीर ही शासनाने ठरवून दिलेल्या चार टाईप प्लॅन प्रमाणे करणे.

| | | | |
|---|---|---|---|
| २) | नवीन रस्त्यांची कामे, खडीकरण, डांबरीकरण. | ३) | गटर बांधकामे |
| ४) | स्मशान शेड | ५) | स्वच्छतागृह |
| ६) | लहान मो-यांची कामे | ७) | निवारा शेड |
| ८) | व्यायाम शाळा / तालीम इमारत / वाचनालय इ. | ९) | खुले व्यासपीठ |
| १०) | शाळा इमारती, शाळा वि.दु. , डोंगरी विकास कार्यक्रम | ११) | संरक्षक भिंत |
| १२) | शाळा कंपौड | १३) | अंगणवाडी इमारती इत्यादी. |

- **डोंगरी विकास कार्यक्रमातंर्गत शिरोळ व हातकणंगले तालुका वगळता इतर दहा तालुके डोंगरी तालुक्यामध्ये समाविष्ठ होतात.**